# 1st Prelim - Model Answer Paper

## Marathi

**Time : 3 Hrs.** **(Pages 16)** **Marks : 80**

**उ.१ खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ३० ते ४० शब्दांत लिहा.**

१. 'सकाळचा अभ्यास' हा नाट्यउतारा मराठीतील श्रेष्ठ नाटककार राम गणेश गडकरी यांच्या 'संपूर्ण गडकरी' या नाट्यलेखन पुस्तकातून घेतला आहे. यामध्ये सकाळीच अभ्यास करायला बसलेल्या भावंडांचा अभ्यास, मधेच होणारा वाद, मग यातून होणारी भांडणे यांचे सुंदर नाट्यचित्रण लेखकाने केले आहे.

दामू व दिनू हे दोघे भाऊ सकाळी एकत्रच अभ्यासाला व पाठांतर करायला सुरूवात करतात. दिनू पाठांतर करत असताना दामूला त्याच्या आवाजाचा खूप त्रास होत असल्यामुळे दामू दिनूला हळू आवाजात पाठांतर करण्यास सांगतो. उलट दिनू नकार देऊन त्यालाच माजघरात जाऊन बसण्यास सांगतो. दामू मोठा असल्याने चिडून दिनूला एक श्रीमुखात भडकावून देईन असे म्हणतो. यावर लगेचच दिनू आईला दामूचे नाव मोठ्याने ओरडून सांगू लागतो. म्हणून दामू "आई मी नाही काही, हाच मोठमोठ्याने ओरडतो, मला अभ्यास करू देत नाही" अशी तक्रार करतो.

काही वेळानंतर जेव्हा दामूचे रीडर हरवते तेव्हा हे दिनूचेच काम आहे, त्यानेच ते लपवले असेल म्हणून दामू दिनूला याबद्दल विचारतो. आपल्याला या रीडरविषयी काहीच माहित नाही व मी माझा अभ्यास (भूगोल) करीत होतो असे दिनू दामूला पटवून देतो. पण त्याच्या बोलण्यावर विश्वास नसल्याने दामू दिनूला मारण्यास धावून जातो तेव्हा दिनू "आई, दादा मारतो बघ" अशी तक्रार आईकडे करतो.

दामू शांत बसणारा नव्हता तो लगेचच दिनूची पिशवी उलगडायला जाताच दिनू पिशवी लपविण्याचा प्रयत्न करतो. पण दिनूच्या अंगावर धावून येतानाच दामूचा पाय पाटीवर पडून पाटी फुटते. हे दादाने मुद्दामच केले आहे असे दिनू आईला ओरडून सांगतो. मात्र दोघांमध्ये चाललेल्या पिशवीच्या ओढाताणीमुळे पिशवीचा बंदच तुटतो. याची तक्रार मी बाबा कामावरून आल्यावर त्यांच्याकडे करीन, असे धमकावून आईकडे जाऊन दामूची तक्रार करतो.

अशाप्रकारे दामू व दिनूच्या या गंमतीदार छोट्या भांडणातून होणारा वाद, याबद्दलची तक्रार ते आईजवळ करतात.

२. 'सेकंड लेफ्टनंट रामराव राणे' हा पाठ कॅप्टन राजा लिमये यांच्या 'भारताचे परमवीर' या पुस्तकातून घेण्यात आला आहे. भारत-पाक युद्धाच्या वेळी अतुलनीय पराक्रम दाखवणा-या से. ले. रामराव राणे यांच्या शौर्याची ओळख लेखकाने या पाठात करून दिली आहे.

पाकिस्तानी हल्लेखोरांनी पूंचमध्ये भारतीय सेनेच्या तुकडीला वेढ्यात अडकवून राजोरीपर्यंतचा मुलूख आपल्या ताब्यात घेतला. या पाकिस्तानी हल्लेखोरांनी राजोरीसमोर ठिकठिकाणी सुरुंग पेरले आहेत हे से. ले. रामराव राणे यांनी अचूक हेरले. से. ले. रामराव राणे हे बॉंबे इंजिनियरिंग ग्रुपचे एक कोवळ्या वयाचे अधिकारी होते. सुरुंग काढले नाही तर आपले रणगाडे व जवान उद्ध्वस्त होतील हे त्यांना माहित होते. म्हणून त्यांनी आपल्या

साथीदारांना घेऊन सुरुंग शोधून ते निरूपयोगी करण्यास सुरूवात केली. त्यावेळी शत्रू सैन्याकडून त्यांच्यावर तोफांचा बेसुमार भडिमार सुरू झाला. अशावेळी राणे यांनी रणगाड्यांच्या खाली राहून दोन दो-या आपल्या हातात ठेवल्या व रणगाड्याच्या चालकाशेजारी बसलेल्या जवानाला सूचना दिली की डावी दोरी ओढल्यावर रणगाडा थांबवायचा तर उजवी दोरी ओढल्यावर चालू करायचा. नंतर आपल्या सोयीप्रमाणे रणगाडा थांबवून व चालू करून ते रस्त्यातील सुरुंग निकामी करत गेले. त्यावेळी शत्रू सैन्याकडून होत असलेल्या तोफांच्या व मशीनगन्सच्या मा-याची त्यांनी पर्वा केली नाही.

अशाप्रकारे पाकिस्तानी तोफा व मशीनगन्सचा भडिमार होत असताना, स्वतःच्या प्राणांची पर्वा न करता सुरुंग निकामी करण्याचे साहस से. ले. रामराव राणे यांनी केले.

३. 'जीवनसंग्राम' हे व्यक्तिचित्र लेखक डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या 'वादळाचे वंशज' या चरित्रग्रंथातून घेतले आहे. प्रस्तुत व्यक्तिचित्रामध्ये लेखकाने दलित चळवळीतील प्रसिद्ध समाजसेवक व नेता हरिहरराव सोनुले यांचे गुणविशेष सांगितले आहेत.

दुस-यांसाठी आपले आयुष्य वेचणारे पण याची कुठेही वाच्यता न करणारे असे हरिहरराव सोनुले एका आगळ्या धुंदीत व कलंदर वृत्तीत जगले. त्यांनी कुणाची जीवनबाग फुलवली, कुणाला ममतेने गोंजारले, कुणा निराश्रिताला आश्रय दिला. कुणाच्या स्वप्नांना कुरवाळले तर कुणाला आंबेडकर निष्ठेचा अर्थ दिला. हरिहरराव हे थोर समाजचिंतक, कलावंत व राजकारणी होते. हरिहरराव साहित्य, संगीत व कलेचे वेडे होते. निजामी राजवटीत स्वातंत्र्य आणि समतेसाठी जीव कुर्बान करणारे जे काही खंदे वीर होते, त्यांच्या खांद्याला खांदा भिडवून लढणारे हरिहरराव मनाचे निग्रही वीर होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मुक्तिसंग्रामात एक सामान्य सैनिक म्हणून उडी घेताना हरिहररावांनी आपल्या भविष्याचा विचार केला नाही. अस्पृश्य समाजाच्या राजकीय संघर्षात ते सामील झाले. रसाळ पण अमोघ वाणीने (भाषणाने) श्रोत्यांची अंतःकरणे काबीज करून ते सभा जिंकत. उदारता आणि आदरातिथ्य यांच्याशी हरिहररावांचे सघन नाते होते. त्यांची काव्यशास्त्र-विनोद बुद्धी होती. दलित लेखक व कवींना अर्थसाहाय्य देऊन त्यांचे आयुष्य वाढवले पाहिजे यासाठी ते सतत धडपडत राहिले.

हरिहररावांकडे झुंझार नेतृत्व, अमोघ वक्तृत्व, निरामय कर्तृत्व व अम्लान रसिकत्व इत्यादी गुणविशेष होते.

४. 'मी माणूस होईन' हा उतारा कथाकार उत्तम कांबळे यांच्या 'आई समजून घेताना' या आत्मकथनातून घेतला आहे. परिस्थितीने ग्रासल्यामुळे आपल्या मुलाच्या यशाचा आनंद व्यक्त न करू शकणारी आई तशी का वागते हे जेव्हा मुलाला समजते तेव्हा त्याची जगाकडे बघण्याची दृष्टीच बदलते व तो माणूस व्हायचे स्वप्न कसे पाहतो याचे वर्णन केले आहे.

लेखकाचा शाळेत सातवीचा निकाल लागला होता. लेखक आनंदाने उड्या मारत घरी आला होता. आई घरातील जबाबदा-यांनी व दिवसभरातील कष्टाने दमली होती. लेखक शाळेत पहिला आला याचे स्वागत आईने थंड स्वरात केले व त्याला आडावरून पाणी आणण्यास पाठवले. आईकडे आनंद व्यक्त करण्याचे बळच नसावे असे लेखकाला वाटले. आईने भाक-या थापत असताना लेखकाला प्रश्न विचारला की, त्याच्या पुढच्या शिक्षणासाठी खूप खर्च येईल का ? ती पुढे म्हणाली की, पास झालास हे चांगले केलेस पण आता पुढच्या खर्चाचे काय करायचे ? याची तिला चिंता होती. पुढे शिक्षणाच्या खर्चाचे कसे काय निभावणार हे कोडे तिला पडले होते. मुलगा शिकलाच पाहिजे व तो शिकला तरच त्याचे व तिचे नशीब

उजाडणार होते. पण शिक्षणाच्या खर्चाचे काय करायचे ? हा प्रश्न होता. मजुरी वाढत नव्हती. पाऊस पडत नव्हता. लोक मजुरीला मुलखावर चालले होते. आईने मुलाच्या पुढील शिक्षणासाठी खूप कष्ट करण्याची तयारी दाखवली.

अशाप्रकारे प्रापंचिक व आर्थिक चिंतेने ग्रासल्यामुळे लेखकाची आई मुलाच्या पास होण्याचा आनंद व्यक्त करू शकली नाही.

५. 'हिकडं आड तिकडं विहीर' हा पाठ लेखिका 'जनाबाई गि-हे' यांच्या 'मरणकळा' या आत्मकथनातून घेण्यात आला आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शिक्षण घेणा-या लेखिकेला कोणत्या अडचणींचा सामना करावा लागला ते पुढीलप्रमाणे सांगितले आहे.

लेखिकेने डी.एड.ला प्रवेश घेतल्यानंतर ती नगरला हॉस्टेलवर आली. तिची घरची परिस्थिती अतिशय हलाखीची होती. त्यामुळे हॉस्टेलचा खर्च, महिन्याची फी, वह्या, पुस्तके यांचा खर्च देखील तिला भागवता येत नव्हता. ती ज्या कॉलेजात होती ते कॉलेज शारीरिक शिक्षण प्रगतस्तर असल्याने पी.टी.च्या तासासाठी पॅन्टशर्टची गरज होती. तो पूर्ण ड्रेस आणि बूट मोजे मिळून श्याहांशी रूपये द्यावे लागणार होते. जिथे श्याहांशी पैसे नव्हते तिथे श्याहांशी रूपये कसे देणार ? ही चिंता तिला वाटू लागली. अखेरीस पी.टी.चा ड्रेस न घालता तासाला गेली असता सरांनी तिला वर्गातून बाहेर हाकलले. त्यावेळी लेखिकेकडे कोणताच पर्याय नव्हता, ती हॉस्टेलवर येवून रडत बसली. तिची अवस्था पाहून वाघमारेबाई तिला प्राचार्यांकडे घेवून गेल्या व प्राचार्यांना विनंती केली की, हिचे कॉलेज बुडायला लागल्यामुळे ती सारखी रडत बसते. तिला पी.टी.चा ड्रेस देऊन टाका व तिच्या स्कॉलरशिपमधून पैसे काढून घ्या. त्यावर लेखिकेला ड्रेस मिळाला व ती कॉलेजमध्ये जाऊ लागली.

अशाप्रकारे वाघमारेबाईंच्या सहकार्यामुळे पी.टी.च्या तासाला लागणा-या पॅन्टशर्टची गरज भागविली गेली.

उ.२. **(क) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा :**

१. पाळणा म्हणण्यासाठी मातापूरवासिनी रेणुका, तुळजापूरची आई भवानी आले होते.

२. बहावा आणि चिनार वृक्ष बघताना लेखकाला रंगीबेरंगी कपडे घालून कुठलीतरी वरातच चालली आहे असे वाटते.

३. ग्यानबा अमीरच्या वडिलांच्या विडी कारखान्यात मुकादमाचे काम करीत असे.

४. घराने ज्योत्स्ना कदम यांच्या कुटुंबाला सुखसमाधानाचा आसरा दिला, घरपण दिले.

**(ख) पाठ्य-पुस्तकातील गद्यपाठांच्या आधारे खालील वाक्यांतील रिकाम्या जागी योग्य शब्द भरून ती वाक्ये पुन्हा लिहा :**

१. रात्रीची भांडी घासायला **निंगव्वा** आली.

२. मी बेलिफांकडून कोर्टाचा आदेश आणि **डिक्री** घेतली.

३. जगात पैसा फार वाईट **चीज** आहे.

**(ग) खालील वाक्ये कोणी कोणास म्हटली ते लिहा :**

१. असे नाईककाकू राजूच्या आईला उद्देशून म्हणाल्या.

२. असे खाँसाहेब भास्करला उद्देशून म्हणाले.

३. असे सावित्रीबाई जोतीरावांना उद्देशून म्हणाल्या.

SAMPLE

| | | |
|---|---|---|
| उ.३ | **खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ३० ते ४० शब्दांत लिहा :** | |
| १. | 'गुरू हा संतकुळीचा राजा' या अभंगात 'संत ज्ञानेश्वर' यांनी गुरूमहिमा सांगितला आहे, त्यातून त्यांच्या अंतःकरणातील गुरूसंबंधीची भावना लक्षात येते.<br>गुरू माहात्म्य वर्णन करताना संत ज्ञानेश्वर म्हणतात, माझा गुरू म्हणजे संतसमुदायाचा राजा आहे. गुरू हाच माझा प्राणविसावा आहे. गुरूशिवाय या त्रिलोकात दुसरा देव नाही. गुरू सुखसागर आहे, प्रेमाचे आगर आहे. कितीही मोठी संकटे आली तरी न डळमळणारा असा धैर्याचा डोंगर आहे. गुरू साधकाचा साहाय्यक व भक्ताची माय आहे. भक्ताच्या सर्व इच्छा पूर्ण करणारी कामधेनु आहे. गुरूने दिलेल्या ज्ञानामुळे निजधनाचा बोध होतो. गुरूने दिलेल्या साधुबोधामुळे भक्ताचे कल्याण होते. गुरूने केलेल्या उपदेशामुळे मानवाच्या मुक्तीसाठी समर्थन मिळते. गुरू दुष्टांना दंडन करतो व पापाचे खंडन करतो. अशा विविध प्रकारे भक्ताच्या मार्गात येणा-या संकटाचे तो निवारण करतो. गुरूने दिलेल्या तारकमंत्रामुळेच आपण या भवसागरातून सुखरूपपणे पार पडतो.<br>अशाप्रकारे संत ज्ञानेश्वरांनी गुरूचे माहात्म्य वर्णिले आहे व त्यांचे ध्यान गुरूपाशी लागले आहे. | |
| २. | 'निरोप' ही कविता कवयित्री पद्मावती विष्णू गोळे यांच्या 'आकाशवेडी' या काव्यसंग्रहातून घेतली आहे. या कवितेत युद्धावर चाललेल्या आपल्या मुलाला आई निरोप देते आहे.<br>देशाचे रक्षण करण्यासाठी बाळ युद्धावर चालला आहे. तेव्हा आई आपल्या घराला मंगल तोरण बांधत आहे. ती आपल्या मुलाचे औक्षण पंचप्राणांच्या ज्योतींनी करत आहे. उद्याच्या जगाची शांती या मुलाच्या खांद्यावर आहे. स्वतंत्रता कायम ठेवण्यासाठी प्रयत्न करणे, देशाचे रक्षण करणे हे त्याचे कर्तव्य आहे. आई महाराष्ट्राची कन्या आहे त्यामुळे ती वीराचा धर्म जाणते. मुलगा युद्धासाठी रणांगणावर चालला आहे, आई त्याला डोळ्यात अश्रू न आणता हसतमुखाने निरोप देत आहे. आई मुलाला सांगते की, तू रणांगणावर जाशील तेव्हा माझ्या मुखातून हुंदकाही येणार नाही. तिने स्वतःच त्याच्या तलवारीला धार लावून ठेवली आहे. तिला विश्वास आहे की, तिच्या मुलावर अशुभाची सावली पडणार नाही व तो विजयी होऊनच परत येईल. वीराच्या अस्त्र - शस्त्राला माता भवानीचा आशीर्वाद असतो, तसाच आशीर्वाद तिच्या मुलालाही मिळेल. शिवरायांनी रणांगणावर पराक्रम गाजवले आहेत; त्यांचे ते रूप बाळाने युद्धभूमीवर आठवले तर त्याला शौर्य गाजवायला बळ मिळेल. आईची अशी इच्छा आहे की, बाळाने युद्धभूमीवर शौर्य गाजवून, विजयी होऊन यावे. अशा वीर मुलाला जन्म दिल्याचे समाधान तिला मिळावे. युद्धभूमीवरून विजयी होऊन आल्यावर आई आपल्या मुलाला स्वतःच्या हातानी पुन्हा दूधभात भरवणार आहे.<br>अशाप्रकारे रणांगणावर जाणा-या मुलाच्या आईच्या भावना 'निरोप' या कवितेतून व्यक्त झाल्या आहेत. | |
| ३. | जीवनात सारे काही स्वीकारता यावे आणि माणसा-माणसांच्या संबंधात फक्त प्रेम असावे ही भावना 'तहान' या कवितेत कवी म.म.देशपांडे यांनी व्यक्त केली आहे.<br>आपली इच्छा पूर्ण होण्यासाठी कवीला स्वतःमध्ये काही बदल घडवून आणावयाचे आहेत. सगळ्यांची मने जाणून घेण्यासाठी त्याला लहान म्हणजे नम्र व्हावे असे वाटते. दुःख मापण्यासाठी (मन) छाती मोठी असावी असे वाटते. दुस-यांसाठी काही केल्याचे श्रेय तो घेणार नाही. तो निःस्वार्थ व निष्काम राहणार आहे. लाज व खंत गळून जावी असे त्याला वाटते.<br>अशाप्रकारचे बदल कवी आपल्यात घडवू इच्छितात. | |



SAMPLE

४. 'कसं चालेल ?' ही कविता कवी रविचंद्र माधव हडसनकर यांच्या 'राजमुद्रा' या कवितासंग्रहातून घेतली आहे. या कवितेत आत्मसन्मान व आत्मनिर्भरतेसाठी औदासीन्य झटकून ताठ मानेने जगता आले पाहिजे असे सांगितले आहे.

माणसाच्या आयुष्यात सुखदुःखाचा खेळ सुरुच असतो. आयुष्यात घडणा-या घटनांचा माणसाच्या आयुष्यावर परिणाम होत असतो. माणसावर आर्थिक, शारीरिक, मानसिक संकटे येत असतात. अशावेळी मनुष्य खूप निराश होतो. संकटाच्या वेळी माणसाची बुद्धी काम करत नाही. अशावेळी माणूस आपल्या दुःखावर, नशिबावर रूसून बसतो. दुःखाला तो आंजारत- गोंजारत बसतो. अशावेळी या दुःखी माणसाकडे इतर माणसे दयेने पाहतात. दुःख आल्यावर जो स्वतःला दोष देत राहतो किंवा रडत राहतो, तो जगण्याची उमेद हरवून बसतो. असा माणूस परावलंबी होऊन त्याचा आत्मसन्मान व आत्मनिर्भरता नष्ट होते. अशा या दुःखी, निरुत्साही माणसाच्या संदर्भात कवी म्हणतो की निराशा, दुःख माणसाच्या जीवनाला पोखरून काढतात. अशा या निराशा व दुःखाला कवटाळून कसे चालेल ? जीवन म्हटले की कधी सुख तर कधी दुःख हे असणारच. दुःखामध्ये सुदधा आपल्याला आपले कर्तव्य पूर्ण करावेच लागते. भित्र्या माणसांच्या बरोबर राहून माणूस भित्रा होतो म्हणूनच मेंढराच्या कळपात घुसू नये असे कवी म्हणतो.

अशाप्रकारे उदासीनता झटकून टाकण्याच्या संदर्भात कवीने 'कसं चालेल ?' हा प्रश्न विचारला आहे.

५. आदिवासींमध्ये समाज जागृती करणा-या कवयित्री उषा आत्राम यांच्या 'म्होरकी' या काव्यसंग्रहातून 'शब्दशस्त्र' ही कविता घेण्यात आली आहे. या कवितेत कवयित्रीने समाज जागृतीसाठी शब्दांचे महत्त्व वर्णन केले आहे.

कवयित्रीच्या मते भवितव्याचे स्वप्न साकार करण्याचे माध्यम 'शब्द' आहेत. कवयित्रीसाठी शब्द हे सूर्योदयाच्या स्वामीप्रमाणे तेजस्वी आहेत. शब्दांच्या मदतीनेच आपण भूतकाळातील इतिहास जाणून घेतो. जणू हे शब्द पृथ्वीचा आरसाच आहेत. शस्त्र व अस्त्राप्रमाणेच शब्द प्रभावशाली असावेत, त्यासाठी त्यांना शस्त्राचे पाते प्राप्त व्हावे असे कवयित्रीला वाटते. वातींप्रमाणेच शब्दही तेजस्वी असावे जेणेकरून मनामनातील परस्पर नातेसंबंध उजळून निघतील. तळहातावरही हे शस्त्र-सूर्याचे नाते उगवावे असे कवयित्री म्हणते. युद्धाचे विध्वंसक परिणाम टाळून बुद्धांचे अहिंसेचे तत्त्व प्रस्थापित करण्यासाठी अस्त्र व शस्त्र म्हणून शब्दांचाच वापर केला पाहिजे. त्यामुळे सूर्योदय म्हणजे उद्याचे भविष्यही शब्दांकडेच सोपवले जावे असे कवयित्रीला वाटते. इवल्याशा पात्याप्रमाणे भासणा-या या शब्दशस्त्राकडे सूर्यतेजाच्या नात्याइतके सामर्थ्य आहे. म्हणूनच कवयित्री भविष्यकाळात समाज जागृती घडवून आणण्यासाठी हे शब्दशस्त्र आपल्या सहका-यांना देऊन जात आहे.

अशाप्रकारे कवयित्रीने शब्दांचे तेजस्वीपणा व महत्त्व पटवून दिले आहे.

उ.४ **(क) खालीलपैकी कोणत्याही एका काव्यपंक्तीचा संदर्भासह अर्थ लिहा :**

१. **संदर्भ -** 'संघर्ष' या कवितेत कवी 'तुळशीराम काजे' यांनी न्यायासाठी व हक्कांसाठी श्रमिकांनी संघर्ष करण्यास प्रवृत्त व्हावे असे सुचविले आहे.

**स्पष्टीकरण -** श्रमिकांना संघर्षासाठी आवाहन करताना कवी म्हणतो की, न्याय व नीतीसाठी संघर्ष करताना श्रमिकांची भाषा (वाणी) हे शस्त्र व्हायला पाहिजे. तिथे साखरपेरणी कामाची नाही. म्हणजेच गोड-गोड बोलण्याचा काहीही उपयोग होणार नाही.

SAMPLE

२. **संदर्भ -** नव्या पिढीतील ग्रामीण कवी म्हणून प्रसिद्ध असलेले कवी शंकर वाडेवाले यांच्या 'मायीचं गाणं' या कवितासंग्रहातून 'श्वास' ही कविता घेण्यात आली आहे. या कवितेत दुष्काळामुळे अगतिक झालेल्या व सुकाळासाठी पावसाची आराधना करणा-या शेतक-याचे दुःख व्यक्त झाले आहे.

**स्पष्टीकरण -** दुष्काळामुळे व्यथित झालेला शेतकरी पावसाची आराधना करीत आहे. काही केल्या पाऊस पडत नाही. अशावेळी शेतकरी दयाघनासमोर (परमेश्वर) आपले गा-हाणे मांडतो की, 'हे देवा, रोज पाऊस पडेल ही आशा मनात बाळगून मी दिवस कंठीत आहे व भेगाळलेल्या जमिनीला मी माझ्या श्वासांइतकेच जपत आहे. तेव्हा आतातरी पाऊस पडू दे.'

**(ख) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा :**

१. नाम घेताना काळवेळ पाहण्याची गरज नाही.

२. कवीकडे चिनी मातीच्या बाहुल्या नव्हत्या.

३. प्रकाशाचा सोहळा साजरा करावा असे कवीला वाटते.

**उ.७ खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ४० ते ५० शब्दांत लिहा :**

१. श्रेष्ठ कथाकार, गांधीवादी विचारवंत लेखक वामन चोरघडे यांच्या 'संपूर्ण चोरघडे' या पुस्तकातून 'काचेची किमया' ही कथा घेतली आहे. प्रस्तुत कथेत निरागस बालपणात लेखकाला लागलेला लळा, त्यानंतर निर्माण झालेला विरह आणि तरीही अविस्मरणीय राहिलेले मायेचे अतूट बंध याचे हृदयस्पर्शी चित्रण केले आहे.

जूलिया सुखवस्तू कुटुंबातील, उंच शरीरयष्टीची, गोरीपान, सुंदर आणि तितकीच निरागस अशी लहान मुलगी. तिला मराठी जास्त बोलता येत नव्हते कारण तिची भाषा इंग्रजी होती. जूलियाचे वडील जिल्हाधिकारी होते. शहराबाहेर काही अंतरावर त्यांचा टुमदार बंगला होता. या बंगल्यात तीनच माणसे राहत होती. जूलियाचे वडील, जूलिया आणि म्हातारा शिपाई विठू! थोरामोठ्यांची मुलगी असल्याने घरात कशाचीही कमी नव्हती. पण लहान मुलांना सुबत्तेपेक्षा स्नेहाची जास्त गरज असते आणि तेच तिच्या बालजीवनात तिला मिळत नव्हते. जूलियाच्या लहानपणीच तिची आई तिला सोडून गेली होती. बालपणी मुलांना आईच्या मायेची, भावंडांच्या प्रेमाची गरज असते, पण तेच जूलियाच्या नशिबी नव्हते. कर्तव्य आणि जबाबदारीने बांधले गेलेले तिचे वडील जूलियाला हे सुख देण्यास असमर्थ होते. एकटेपणाच्या दुःखाने जूलिया कधी-कधी खूप रडत असे.

संध्याकाळच्या वेळेस सायकलवरून इकडून-तिकडे फिरायला तिला आवडत होते. कधी-कधी घरी असलेल्या झब्बूदार कुत्र्याबरोबर ती खेळत असे. एवढ्या मोठ्या बंगल्यात तिच्याबरोबर खेळण्यासाठी कुणीही नव्हते. आपल्या बरोबरीच्या लहान मुलांशी खूप खेळावं, मौजमस्ती करावी असे तिला वाटत असे. जूलिया शांत, मनमोकळ्या स्वभावाची मुलगी होती, त्यामुळे लहान लेखकाशी तिची गाढ मैत्री जुळली. लेखकाचे गालगुच्चे घेऊन ते गुलाबी झालेले पाहण्यात तिला मौज वाटत असे. लेखकाच्या रूपातून भावाचे प्रेम ती अनुभवत होती. मावशीबरोबर लंडनला जाताना तिने लेखकाला एक जादूची काच बक्षीस दिली.

अशी होती - सुंदर, सुरेख, निरागस, मनमोकळ्या स्वभावाची व मनात निष्पाप प्रेमाची, मायेची ओढ घेऊन जगणारी जूलिया!

SAMPLE

२. प्रसिद्ध कथाकार, ललितनिबंधकार लेखक प्रकाश संत यांच्या 'वनवास' या कथासंग्रहातून 'फुलाची गोष्ट' ही कथा घेतली आहे. प्रस्तुत कथेत लंपन नावाच्या मुलाने सांगितलेली आजीच्या वाढदिवसाची गोष्ट, आजी व आजोबा यांच्यातील भावबंध आणि लंपनचे भाबडेपण यांचे चित्रण केले आहे.

त्या दिवशी आजीचा वाढदिवस होता, हे लंपनला माहित नव्हते. सकाळपासून घरात एक वेगळेच वातावरण वाटत होते, पण विचार करूनही ते लहान लंपनला समजत नव्हते. आजी नवीन पातळ नेसली होती, घरात कसला तरी छान वास सुटला होता. आजोबा मधून-मधून स्वयंपाकघरात डोकावत होते. उगीच इकडे-तिकडे फिरत होते. लंपन पतंग तयार करीत असताना आजोबांच्या हालचाली पाहत होता, ते तसे का वागत होते हे मात्र त्याला समजत नव्हते. थोड्या वेळाने आजोबा लंपनशेजारी येऊन त्याच्याकडे एकटक पाहत बसले. ब-याच वेळाने त्यांनी लंपनला विचारले की "माझे एक काम करशील का?" आजोबांच्या डोळ्यांत आज एक वेगळाच प्रेमभाव लंपनला दिसून आला. तो प्रेमळपणा पाहून लंपनने लगेच होकार दिला. आजोबांनी हळूच एक तांबडं-लाल गुलाबाचे सुंदर फूल काढले. लंपनच्या हातात देऊन त्यांनी ते फूल आजीला द्यायला सांगितले. लंपन धावतच ते फूल घेऊन आजीकडे गेला. त्यावेळी आजी कधी नव्हे ती गाणे गुणगुणत होती. आज लंपनला आजी आपल्या आईसारखीच लहान वाटली. आजोबांनी दिलेले सुंदर फूल लंपनने आजीसमोर धरले. ते सुंदर फूल पाहताच आजीने लंपनचा गोड पापा घेतला आणि विचारले, "ह्यांनी दिले का रे फूल?" लंपनला आश्चर्य वाटले. ते फूल म्हणजे आजोबांचे आजीवरील अतूट प्रेमाचे प्रतीक होते. दोघांचे भावबंध त्या फूलातून प्रतित होत होते. आजीने ते सुंदर गुलाबाचे फूल हळुवारपणे आपल्या केसात खोवले. आपली आजी आता लंपनला अधिकच छान दिसू लागली होती.

अशाप्रकारे एकमेकांच्या अतूट प्रेमाचे प्रतीक असलेले ते सुंदर गुलाबाचे फूल आजीने आनंदाने आपल्या केसात लावले व आजोबांच्या अबोल प्रेमाचा स्वीकार केला.

३. ग्रामीण वास्तवाचे डोळसपणे चित्रण करणारे लेखक, कथाकार डॉ. वासुदेव मुलाटे यांनी 'अंगठा' या कथेत सत्ताधारी वर्गाकडून गरीब, अशिक्षित शेतक-याची कशी फसवणूक केली जाते, त्यांचे शोषण कसे केले जाते, याचे विदारक चित्र रेखाटले आहे.

गणपा हा खेडेगावातील गरीब, अडाणी शेतकरी आहे. शेती हेच त्याच्या उदरनिर्वाहाचे एकमेव साधन होते. ती शेतीही पावसावर अवलंबून असल्याने निश्चित असे उत्पन्न मिळत नव्हते. एखाद्या वर्षी पाऊसच पडला नाही तर डोक्यावर कर्जाचा डोंगर व्हायचा. आपल्या मुलीच्या लग्नासाठी गणपाने गावातील सोसायटीचे तीनशे रूपये कर्ज उचलले. वेळेवर पाऊस पडला तर आपण कर्जाची परतफेड करू, असे गणपाला वाटले. पण दुर्दैवाने पाऊस पडलाच नाही, त्यामुळे कर्जाची परतफेड तर दूरच पण घरात खाण्याची पंचाईत झाली. सोसायटीची मुद्दल तर नाहीच पण व्याजाचे हप्तेही गणपा वेळेवर भरू शकला नाही. शेवटी व्हायचे तेच झाले. कर्जाचे हप्ते वेळेवर न भरल्याने सोसायटीकडून गणपाला जप्ती अधिका-याची नोटीस आली. 'दुष्काळात तेरावा महिना' अशी त्याची अवस्था झाली. जप्तीच्या होणा-या परिणामाने गणपा खचून गेला होता. यातून काय मार्ग काढावा हे त्याला सूचत नव्हते. अशा बिकट परिस्थितीत गणपाला रावसाहेबांची आठवण होते. रावसाहेब हे सोसायटीचे चेअरमन होते. गावात त्यांचा दरारा फार होता. अडल्यानडलेल्यांची कामे ते करीत होते. रावसाहेबांनी याबाबतीत आपल्याला मदत करून आपली जप्ती चुकवावी व पुढच्या वर्षी थकबाकीचे हप्ते भरण्याची सवलत द्यावी, या अपेक्षेने गणपा रावसाहेबांकडे आला होता.

४. लेखिका माधुरी शानभाग यांनी लिहिलेल्या 'आणखी एक रस्ता' या पुस्तकातून 'प्रीतम' ही कथा घेतली असून प्रस्तुत कथेत प्रीतम नावाच्या मुलाची कौटुंबिक, भावनिक स्थिती वर्णन केली आहे. तसेच शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील भावबंध व पवित्र नात्याचे वर्णन केले आहे.

लहान मुलांना जर आपल्या माता-पित्यांचा सहवास, कुटुंबियांचे प्रेम मिळाले नाही, त्यांच्यापासून ती दुरावली तर मुले अबोल, एकलकोंडी बनतात. प्रीतमच्या बाबतीतही काहीसे असेच घडले. दुर्दैवाने प्रीतमची आई त्याच्या लहानपणीच वारली. वडील सैन्यात नोकरी करीत असल्यामुळे त्यांचाही सहवास प्रीतमला लाभला नाही. घरात कुणीही भावंडे नव्हती. जवळचे नातेवाईक होते ते फक्त त्याचे मामा. आईच्या मृत्यूनंतर प्रीतम आपल्या वडिलांबरोबर सुरूवातीला काही दिवस पंजाबात, नंतर एक वर्ष बंगालमध्ये राहिला. सेनेतील नोकरीमुळे नंतर वडिलांना सीमेवर जावे लागले. अशा प्रतिकूल परिस्थितीत प्रीतमला त्यांनी त्याच्या मामामामींकडे ठेवले. प्रीतमच्या खर्चासाठी ते पैसे पाठवत होते. आईच्या मृत्यूनंतर आपल्या स्वतःच्या घराला मुकलेला प्रीतम आता मामांच्या घरी राहू लागला. मात्र तिथे त्याला प्रेम, माया, आपलेपणा मिळाला नाही. मामीची तीन लहान मुले तिला नेहमी त्रास देत असत, त्याचा राग ती प्रीतमवर काढत होती. सतत त्याला टाकून बोलत होती. प्रीतमला सांभाळणे तिला नकोसे झाले होते. प्रीतमबद्दल खोटी तक्रार ती मामांकडे करीत असे आणि मग मामा प्रीतमला मारत असत. नापास झाला तर बाबांना सांगून बोर्डिंगमध्ये ठेवण्याची धमकी ते देत होते. प्रीतमला या गोष्टींची भीती वाटत असे. प्रीतमचा शाळेचा यूनिफॉर्मसुद्धा जीर्ण झालेला होता. मामामामींचे त्याच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष होते. घरातील अशा परकेपणाच्या वागणुकीमुळे प्रीतमचे शरीरही दुर्बल झाले होते. ज्या वयात मुलांना मायेची, आपल्या माणसांच्या आधाराची गरज असते, त्याच वयात प्रीतमला तिरस्कार, परकेपणा सहन करावा लागला होता.

अशाप्रकारे प्रीतमच्या घरच्या विदारक परिस्थितीमुळे प्रीतम एकलकोंडा आणि अबोल बनला.

**उ.६ खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्द्याच्या आधारे सुमारे १५० शब्दांत निबंध लिहा. :**

१. **निसर्ग एक गुरू**

माणसाच्या आयुष्यातील पहिला गुरू म्हणजे आई. त्यानंतर माणूस बरंच काही शिकतो ते निसर्गाकडून ! शाळेत जाण्यापूर्वीपासून तो आपल्याला ज्ञानाचे धडे देऊ लागतो. अगदी बालपणापासूनच निसर्गाशी आपले नाते जोडले जाते याचा संदर्भ पौराणिक कथांतून देखील मिळतो. बाल हनुमानाला आकाश फलकावर तळपणा-या सूर्यबिंबाचे आकर्षण वाटले व त्याने त्याच्या दिशेने झेप घेतली होती. आजी अजूनही लहानांना चिऊ-काऊच्या गोष्टी सांगून निद्रादेवीच्या कुशीत झोपवते. हेच निसर्गाचे आकर्षण कायम असते म्हणून आपण सहली, गिर्यारोहण, भटकंतीच्या निमित्ताने निसर्गाकडे अनामिकपणे ओढले जातो.

निसर्गाच्या सहवासात माणसाच्या वृत्ती फुलून येतात. निसर्गाला एक जादूगरही म्हणता येईल. आपल्या जादूने तो नवी सृष्टी फुलवतो. उन्हाळ्याच्या रखरखलेल्या जमिनीवर वर्षा ऋतूत मात्र हिरव्या तृणांचा शालू पांघरलेला दिसतो. वेगवेगळ्या रंगांची सुगंधी फुले त्या शालूची शोभा अधिकच खुलवतात. फुलांच्या सुगंधांनी वातावरण धुंद बनवतात. संसारातील चिंता, दुःख या दृश्यांनी पार नष्टच होतात.

निसर्गातील प्रत्येक देखावा आपल्याला काहीतरी संदेश देत असतो. प्रत्येक दृश्य जीवन

जगण्याचा खरा अर्थ शिकवत असते. तळपणारा सूर्य चारही दिशांना प्रकाशमय किरणे पसरवतो, अंधःकाराचा नाश करतो. स्वतः तळपत राहून सर्वांना जीवन देतो. रात्रीच्या स्वप्नांचा सौदागर तो चंद्र, स्वतः रात्रभर जागून वाटसरूंना मार्ग दाखवतो. त्याचा शुभ्र चंद्रप्रकाश सगळीकडे शीतलता पसरवतो. चंद्र आणि सूर्याला देखील ग्रहण व्यापून टाकते. पण म्हणून काही ते आपला गुणधर्म सोडत नाहीत. यातून ते आपल्याला जीवनाचा खरा मार्गच सुचवतात. दुःखाने खचून न जाता हिंमतीने जगण्यातच खरी मजा आहे हे आपल्याला समजावून देत असतात. दिवसामागून येणारी रात्र व रात्र सरल्यानंतर पुनः दिवस हे चक्र आपल्याला सांगत असते की दुःख सरले की मागोमाग सुखाचे दिवस आल्यावाचून राहत नाहीत. सुख-दुःखाच्या धाग्याने विणलेले हे वस्त्र म्हणजेच जीवन, जे हसत-हसत ओढावे असं जणू काही निसर्ग सांगत असतो. खळखळ वाहणारा निर्झर जीवनाचेच गीत गातो, खडकाळ मार्गातही उड्या मारत, मधूर नाद करत जातो. येणा-या संकटातही हसत राहायला शिकवतो. नदीच्या सहवासात विविध संस्कृती विकसित होतात. अथांग पसरलेला गुढ रत्नाकर सतत आपली मदतच करत असतो. आपली मर्यादा न ओलांडता जगायला शिकवतो हा समुद्र.

ज्याप्रमाणे गुरू आपल्याकडे असलेले ज्ञान कसलाही विचार, स्वार्थ न करता शिष्याला भरभरून देतच असतो. त्याच्या मोबदल्यात त्याची कोणतीही अपेक्षा नसते. अगदी त्याप्रमाणे निसर्ग केवळ स्वप्न पुरवतच नाही तर तो सहस्त्र करांनी सतत सढळहस्ते मानवाची मदत करतो, अगदी निरपेक्षपणे ! शिष्य चुकीच्या मार्गाने जाताना दिसला तर गुरू त्याला वेळीच कडक शिक्षा देऊन योग्य मार्गावर आणतो. तुटपुंज्या ज्ञानाने गर्विष्ठ होऊन माणूस जेव्हा निसर्गावर मात करण्याचे स्वप्न पाहू लागतो, तेव्हा भूकंप, दुष्काळ, त्सुनामी, महापूर इ., असे दणके देऊन आपले अस्तित्व व वर्चस्व तो दाखवून देतो.

निसर्गाने मानवाला भव्यता, उदात्तता, रौद्रता, शीतलता या गुणांची ओळख पटवून दिली. मानवाने त्याचे सामर्थ्य ओळखले पाहिजे. त्यावर मात करण्यापेक्षा त्याचे ऋणी राहिले पाहिजे. कारण .........

'निसर्गाविना जीवन केवळ .... असंभव'.

२.

**माझे आजोबा**

अंगात खादीचा सदरा, चुणीदार पायजामा व डोक्यावर गांधी टोपी असा पोशाख आणि हातात काठी, आधारासाठी नव्हे तर आपल्या रुबाबात भर घालण्यासाठी ! असा वेष होता माझ्या आजोबांचा ! पायातल्या कोल्हापुरी चपलांचा होणारा करकर आवाज सर्वांचे लक्ष वेधून घेत असे. त्यांची करारी मुद्रा पटकन कोणाच्याही मनात दरारा उत्पन्न करीत असे. कां नाही होणार ? कारण त्यांचे आयुष्य शत्रूंशी मुकाबला करण्यातच सीमेवर गेले. कित्येक शत्रूंना त्यांनी सीमेवर कंठस्नान घातले आहे. ते नेहमीच म्हणत असत की, 'विद्या, शौर्य, दक्षता, बल व धीर हेच माणसाचे खरे मित्र आहेत.'

लष्करातून निवृत्त झाल्यानंतर नेहमी त्यांच्या शौर्याच्या कथा विचारुन आम्ही त्यांना भंडावून सोडत असू, आणि आजोबादेखील कधीही न कंटाळता पुन्हा पुन्हा त्या आठवणींमध्ये रंगून जात. आपल्या साहसाचे वर्णन आम्हांला सांगताना ते म्हणत. 'विजयाच्या अटी अगदी सोप्या आहेत. आपण काही वेळ कष्ट केले पाहिजेत. थोडावेळ सहन केले पाहिजे. नेहमी विश्वास ठेवला पाहिजे आणि परतीचा विचार मनातून काढून टाकला पाहिजे.' माझे आजोबा

सदैव कोणत्या न कोणत्या कामात गुंतलेले असत. सकाळी उठल्यावर सर्वप्रथम व्यायाम, ध्यान-धारणेत त्यांचा वेळ जाई. नंतर शूचिर्भूत होऊन गावात फेरफटका मारावयास जात. रस्त्यात सर्वांशी गप्पा-गोष्टी करत, अडलेल्यांना मदत करत, सर्वांना कोणते ना कोणते सल्ले देतच त्यांची सकाळ निघून जाई, दुपारी जेवणानंतर थोडावेळ वामकुक्षी व नंतर वाचन हा त्यांचा नित्यक्रम. आम्ही त्यांना नेहमी विचारत असू की, "आजोबा, तुम्ही हे सारखे-सारखे काय वाचत असता ?" तेव्हा ते आम्हांला समजावून सांगत की, "महात्मा गांधी सारख्या श्रेष्ठ नेत्याने सांगितले आहे, ज्याला उत्तम ग्रंथ वाचवण्याचा छंद असतो, तो जगात कुठेही सुखी राहू शकतो. मग मी सुखी राहण्यासाठीच विविध ग्रंथांचे वाचन करतो, आणि तुम्हांला गोष्टी सांगण्यासाठी मला या वाचनाचा उपयोग होतो."

माझे आजोबा सतत सर्वांसाठी धडपडत असत आणि म्हणत, 'धडपड हे जीवनाचे काव्य आहे.' त्यांच्याजवळ कोणीही काही मागण्यासाठी येऊन रिकाम्या हाती गेले असे कधीच झाले नाही. आम्ही त्यांना कधी कधी म्हणत असू, "काय हो आजोबा, तुम्ही नेहमी सर्वांनाच काहीना काही देतच असता ? तेव्हा ते म्हणत, महर्षी वाल्मिकींनी सांगितले आहे की, सेवेमुळे शत्रूदेखील मित्र बनतो, आणि रविंद्रनाथ टागोर म्हणत असत की, तीन गोष्टी देत रहा - मान, दान, ज्ञान. मग त्यांच्या मानाने मी तर खूप सर्वसामान्य आहे. माझ्या परिने मी जशी जमेल तशी मदत करतो. मला या मदतीच्या बदल्यात कोणाकडून काही अपेक्षाही नाही. कारण प्राप्तीच्या आनंदापेक्षा प्रयत्नांचा आनंद अधिक मोठा असतो. जर आपण असहाय-गरजू व्यक्तींना मदत करून त्यांच्या चेह-यावर तृप्तीचे हास्य आणण्याचा प्रयत्न केला, तर तीर्थक्षेत्री जाऊन शोधत असलेले सुखसमाधान घरबसल्या मिळू शकेल. त्यासाठी एकच करायला हवे. माणसात देव शोधायला हवा." असे माझे आजोबा, आज सोबत नसले तरी त्यांच्या आठवणी सोबत आहेत व जीवनात मला सतत मार्गदर्शन करीत आहेत. आणि म्हणूनच 'आजोबा, या एका हाकेसरशी मनात गर्जणारा आठवणींचा समुद्र अजून तेवढाच जागा आहे!'

३.

**एका अपंग व्यक्तिचे आत्मवृत्त**

खरं तर उकिरड्यावरचं जीवन जगायचं. तेही औरस असून ! पण आईने काळीज घट्ट केलं. धीर सोडला नाही की मलाही सोडू दिला नाही. खरंच

"कुपुत्रो जायते, क्वचिद्पि कुमाता न भवति।"

माझ्यासारख्या जन्मतः दोन्ही हात नसलेला कुपुत्र जन्मूनही तिने मला छातीशी घेतले, त्यावेळी लोकांनी विचारलं, 'काय करणार तू याचं ?' कुठवर ? त्यालाही अवघड, अनं तुलाही. आश्रमात तरी ...' तिनं कुणाचंच ऐकलं नाही. वर थाटाने बारसे केले. नाव ठेवलं - प्रसाद! जणू देवाचा !

मी म्हणजे नशिबाने तिच्यापुढे उभं केलेलं आव्हान होतं. तिनेही ते स्वीकारलं. पेलण्यासाठी तिने कंबर कसली. अश्रूंना अटकाव करत प्रयत्नांची शर्थ करू लागली... मी दिसामासाने वाढू लागलो. मुठी न चोखता पायाचा अंगठा चोखू लागलो. रांगण्याच्या ऐवजी मी वळवळत बसलो. कुणाच्या मदतीशिवाय !... आश्चर्याने, आनंदतिशयाने आई धावली. माझ्या पायाची असंख्य चुंबनं घेत मला कुरवाळत राहिली. माझ्या पायांनी तिला वाट सापडली. हळूहळू पायाचा वापर ती शिकवू लागली आणि पायांनी खेळणं, भांग पाडणं, दात घासणं, चमचा धरून पायाने जेवणे असे तिने घालून दिलेले धडे मी शिकलो. सावलीसारखी ती माझ्यासोबत



SAMPLE

असायची. शाळेतसुद्‌धा हो, जिद्‌दीने तिने मला शाळेतही घातलं... सारे कुतूहलाने पाहायचे. तालुकाभर चर्चेचा मी विषय झालो.

दोन्ही खांदे झाकलेला, बंद गळ्याचा अंगरखा मला रोमन राजपुत्राची ऐट द्यायचा. गळ्यात दप्तर असायचं. आईची जिद्द मी उचलली. बुद्‌धी तेज होती. चेहरा गोड होता. ज्ञानेंद्रिये चलाख होती, पायात बळ होते. नव्हते तेवढे हात ! पण पायाने मी लिहायचो, तोंडाने अभंग गायचो. शाळेत घेतल्याचं गुरूजींना समाधान वाटायचं... सज्जन मुले मदत करायची पण व्रात्य मुले खोड्या काढायची. 'भुंडा' म्हणून चिडवायची, ढकलून पाडायची. आई म्हणाली, 'तुला पाय आहेत ना ? मग काय, एकदा एका मुलाला पायप्रसाद देऊन लोळवलं 'शोले' मधला ठाकूर बनून. पुन्हा कोणी माझ्या वाटेला गेलं नाही. परमेश्वर एकीकडचं काढून दुसरीकडे भरपाई करतो.

सातवीत एकदा शाळेची तपासणी होती. पुण्याचे साहेब होते. आदर्श विद्यार्थी दाखवा यावर गुरुजींनी मलाच पुढे केले. ते चक्रावले; पण त्यांच्या सर्व प्रश्नांना मी भराभर, अचूक उत्तरं दिली. गाऊन दाखवलं, चित्रं काढून दाखवली. माझ्या मोकळ्या खांद्याकडे ते पाहतच राहिले. खांदे खुपले तरी त्यांच्या मनात मी भरलो. आईला म्हणाले, "रत्न आहे पोरगं ! शहरात का नाही येत ? सोय आहे का ?" "आहे, पण घेणार कोण याला ?" त्यांनीच खटपट केली अन् मी पुण्यात आलो... प्रथम वाटायचं, अंगामध्ये व्यंग। असा मी अपंग। कोण करे संग। माझ्याशी ?" पण तसं झालं नाही. पहिले अस्थिर दिवस सोडले तर मी रुळलो, रमलो. क्षितीजे विस्तारली. पायाचे अजून उपयोग शिकलो. बाजार मीच करतो, पायसायकलीवर किराणा आणतो, शाळेत जातो, पायाने पेटी वाजवतो, खूप वाचन करतो, कविताही करतो, जास्त करून अभंग, मघाशी म्हणून दाखवला ना - तो मीच केलेला अभंग. सर, बाई मला खूप प्रोत्साहन देतात. त्यांनी सुचवल्यावरून 'अपंगाचे अभंग' म्हणून वही पण केलीय. "नोहे मी अपंग। आहे मी अभंग। जीवनाचे रंग। रंगवितो।।" असं काही लिहित असतो. नववीमध्ये ९० टक्के मार्क मिळाले. आईच्या डोळ्यात जे दिसलं. ते काय सांगू ?... हाताचं वळण पायाने पकडलं होतं.

तुमच्याबरोबरच माझा दहावीचा अभ्यास चालू आहे. ईर्षा आहे मेरिट लिस्टमध्ये येण्याची? मग मुलाखतीत 'आयुष्यात अडचणी कोणत्या आल्या ?' या प्रश्नाला माझे उत्तर असेल, 'देवापुढे जोडायला हात नसल्याचेच फक्त!'

४. **सूर्य मावळलाच नाही तर ......**

शाळेला दिवाळीची सुट्‌टी होती. आम्ही सर्व भावंडं मामाच्या गावी गेलो व तेथेच एकत्र जमलो होतो. दिवसभर मजा करूनसुद्‌धा रात्रीच्या वेळी आम्ही खेळायला उत्सुक होतो. मध्येच अंताक्षरी, पत्ते, कॅरम असे आमचे खेळ चालू होते. घरातून आजोबांची हाक आली, "चला मुलांनो झोपायला, आता रात्र झाली आहे." पण आम्हा मुलांना आत जाण्याची मुळीच इच्छा नव्हती.

बिछान्यावर पडता-पडता माझ्या मनात एक विचार आला, सूर्य मावळलाच नाही तर ....

दिवसाचे संपूर्ण २४ तास सर्वत्र उजेड होईल. दिवस-रात्र, तसेच वर्षाचे तीन ऋतुंचे कालचक्र थांबेल. मनुष्याच्या जीवनातील वेळापत्रक नाहीसे होईल. पूर्ण वर्षभर उन्हाळा व पावसाळा हे दोनच ऋतु असतील. पावसामुळे सर्व भाग घनदाट जंगलानेच भरेल. पाण्याची कमतरता राहणार नाही.

SAMPLE

सर्वांच्या दैनंदिन जीवनात निश्चितच बदल होईल. कोणी वेळ विचारली तर सकाळचे दहा कि रात्रीचे दहा असे सांगावे लागेल. एकंदर घड्याळात एक ते चोवीस आकडे असतील. दूरदर्शन, रेल्वे-गाड्या, विमाने या सर्वांच्याच वेळेत फरक पडेल.

सुट्टीच्या दिवशी मुलं एकमेकांना विचारतील, "अरे उद्या १४ वाजून ४७ मिनिटांनी क्रिकेटच्या मैदानावर जमू या आणि गंमत करू या."

परंतु सतत दिवस असल्यामुळे माणसाच्या जीवनात अशांतता वाढेल त्याच्या मनावरही कदाचित परिणाम होईल. झोप कमी होईल. अधिक पैसे मिळवण्याच्या मागे तो दिवसाचे जास्तीत जास्त तास काम करेल. दिवसा मेहनत रात्री विश्रांती हे वेळापत्रक राहणार नाही. ज्यांना आराम करायचा असेल ते आराम करतील. जे जग रात्री शांतपणे झोपलेले असते, त्या जगातला शांतपणा नाहीसा होईल. जमिनीवर तसेच पिकांवर देखील परिणाम होईल. उष्णतेमुळे जमिनीचा कस कमी होईल व अन्नधान्याच्या उत्पादनात कमतरता येईल. कदाचित माणसांना तसेच जनावरांना दुष्काळाचे दुष्परिणाम भोगावे लागतील.

रात्र पडल्यामुळे जे आकाशाचे सौंदर्य मन मोहविते त्यापासून आपण वंचित राहू. चांदण्या रात्री फिरणे, नौकाविहार या गोष्टी करतच राहिले पाहिजे, सूर्य मावळलाच पाहिजे. सर्व विश्वाला रात्री झोप लागलीच पाहिजे व सूर्यालादेखील रात्री विश्रांती मिळालीच पाहिजे.

उ.७. **(क) कंसातील सूचनेप्रमाणे बदल करून शब्द पुन्हा लिहा :**

१. **स्त्रीलिंगी रूपे लिहा :**

१. लांडोर  २. पाटलीण  ३. डबी

२. **पुल्लिंगी रूपे लिहा :**

१. नातू  २. सेवक  ३. सुतार

**(ख) कंसातील सूचनेप्रमाणे वाक्यात बदल करून वाक्ये पुन्हा लिहा :**

१. नुसत्या हरभ-यासाठी आपल्याकडे कोणीही यायला बसले नाही.
२. अग, भारा तरी खाली टाकशील का ?
३. किती उदार होत्या सावित्रीबाई!
४. मला माझ्या लोकांच्या वाणीवर वसू दे.

**(ग) खालीलपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमानुसार शुद्ध करून लिहा :**

१. देऊ का भडकावून एक श्रीमुखात?
२. अंत्ययात्रेत त्या अग्रभागी चालल्या.

**(घ) खालील वाक्प्रचारांचा योग्य वाक्यात उपयोग करून ती वाक्ये पुन्हा लिहा :**

१. वस्तू खराब झाल्यास ती बदलून देण्याची दुकानदाराने हमी दिली.
२. अन्यायाविरूद्ध बोलताना भीड धरू नये.
३. आपल्या समाजातील अन्यायकारक चालीरीती, रूढी, अंधश्रद्धा आपण झुगारून दिल्या पाहिजेत.
४. संकटसमयीदेखील माणसाने मनात ऊर्मी बाळगली पाहिजे.
५. मनात तळपट ठेवले की माणसे दुरावतात.
६. आपल्याला स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळाले आहे हे दिनेशच्या गावीच नव्हते.

SAMPLE

उ. ८ **(क) खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कोणतीही एक गोष्ट लिहा. शीर्षक देऊन तात्पर्य लिहा :**

**गौतमबुद्धांचा उपदेश**

हरिपूर गावात मथुरा नावाची एक विधवा, अनाथ स्त्री राहत होती. आपल्या एकुलत्या एक मुलाचे पालनपोषण मोठ्या धीराने व हिमतीने करत होती. पण देवाला तिचे हेही सुख बघवले नाही. एक दिवस अचानक तिचे मूल निधन पावले. मथुरेवर दुःखाचा डोंगर कोसळला. तिचा शोक अनावर होता. तिचे रडणे पाहून इतर लोकही हेलावून गेले.

पुत्र वियोगाने वेडी झालेली मथुरा आपल्या मृत मुलाला घेऊन रडत रडत गौतमबुद्धांकडे आली. मुलाचा मृतदेह बुद्धांच्या पायाशी ठेवून ती धाय मोकलून रडू लागली. बुद्धांनी काही चमत्कार करावा व आपल्या मुलास पुन्हा जिवंत करावे असा तिने त्यांच्याकडे हट्टच धरला.

बुद्धांनी शांतपणे तिचे म्हणणे ऐकून घेतले. क्षणभर ते स्तब्ध झाले. थोडासा विचार केला व म्हणाले, 'ठीक आहे. मी तुझ्या मुलास जिवंत करतो. पण त्यासाठी माझीही एक अट आहे."

मथुरेची आशा पालवली. उत्सुकतेने तिने विचारले, "कोणती भगवान ?"

"ज्या घरात आजपर्यंत एकही मृत्यू झाला नाही अशा घरातून मला मूठभर मोह-या आणून दे."

मथुरा आनंदली व लगेच मोह-या आणावयास निघाली. गावातील प्रत्येक घरात ती गेली. शेजारचे गावही तिने पालथे घातले. पण असे एक ही घर तिला आढळले नाही की ज्या घरात कोणी मेलेले नाही. प्रत्येक घरात कोणी ना कोणी मेले होते. बुद्धांनी घातलेल्या अटीचा अर्थबोध आता तिला झाला. त्यामुळेच तिच्या दुःखाचा आवेगही ओसरला व ती शांत झाली.

**तात्पर्य :** जन्माला आलेली प्रत्येक व्यक्ती कधी ना कधी मरणारच. मृत्यू हा अटळ आहे, हे सत्य आपण स्वीकारले पाहिजे.

**सिंहाचा वाटा/बळी तो कान पिळी**

चंद्रपूरच्या अरण्यात अनेक प्रकारचे प्राणी राहत होते. त्याच अरण्यातील एक सिंह, कोल्हा व कुत्रा यांची मैत्री जमली. त्यांनी एक करार केला, तो असा की, तिघांनी मिळून शिकार करायची व जे काही मिळेल ते तिघांनी सारखे वाटून घ्यायचे.

एके दिवशी शिकार करण्यासाठी ते तिघेही निघाले. इतक्यात समोरुन एक हरीण धूम पळत सुटलेले दिसले. कुत्र्याने त्याला प्रथम पाहिले. त्याने कोल्ह्याला खुणेने सांगितले. कोल्ह्याने लगेच ती गोष्ट सिंहाला सुचविली. सिंहाने जोरात झेप टाकली व पाठलाग करून त्या हरणाला ठार केले.

सिंहाला वाटले ही शिकार आपण केली म्हणून ती आपणालाच मिळावी. कुत्र्याला वाटले शिकार प्रथम आपण पाहिली व कोल्ह्याला वाटले आपण जर सिंहाला खुणवले नसते तर शिकार कशी मिळाली असती. तेव्हा शिकारीवर सर्वांचाच हक्क आहे.

पुढे कराराप्रमाणे कुत्र्याने हरणाचे समान तीन वाटे केले. सिंहाला हे कबूल नव्हते. त्याला सगळीच शिकार एकट्याला हवी होती. त्याने एक युक्ती काढली.

वाटे करून झाल्यावर तो पुढे सरसावला. व "माझा वाटा मी घेतो" असे म्हणत त्याने एक वाटा उचलला. नंतर तो पुढे म्हणाला, "खरं सांगा, ही शिकार कोणी केली ? मीच ना ?



SAMPLE

मी नसतो तर ही शिकार झाली नसती, शिकार केल्याबद्दल हा दुसरा वाटा मला मिळायला पाहिजे." असे म्हणून सिंहाने कोल्ह्यापुढील दुसरा वाटा उचलला. हे पाहून कोल्ह्याला फार वाईट वाटले. पण करतो काय बिचारा ?

मग सिंह कुत्र्याजवळ गेला व म्हणाला, "मी सर्व पशूंचा राजा ना ? राजा म्हणून मला एक वाटा नको का ? असे म्हणून कुत्र्यापुढे ठेवलेला तिसरा वाटा ही त्याने उचलला.

कुत्रा व कोल्हा हे सिंहाच्या मानाने दुबळे व अशक्त ! करतात काय बिचारे ? शिकार करूनही त्या दोघांना त्या दिवशी उपास मात्र घडला.

**तात्पर्य** : शक्तीच्या जोरावर आपल्यापेक्षा दुर्बल लोकांवर अन्याय करू नये. तसेच दिलेला शब्द प्रामाणिकपणे पाळावा.

**(ख) खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे स्वतःच्या भाषेत लिहा :**

१. सूर्योदयाची सुंदरता ही परमेश्वराची दिव्य कला आहे. सूर्य रोज मानवाला हाक मारून उठवतो व काम करण्यास सांगतो. सूर्य स्थावर जंगमाचा आत्मा आहे. त्याने स्वर्ग पृथ्वीचे रूप धारण केले आहे. सूर्य हा जीवनाचा आधार आहे. सूर्याचे दर्शन म्हणजे परमात्म्याचे दर्शन म्हणून सूर्याला परमात्मा म्हटले आहे.

२. चित्रकार महिनेच्या महिने कुंचले मारून सूर्योदयाची चित्रे रंगवितात.

३. सूर्याच्या दर्शनाला परमात्म्याच्या दर्शनाची उपमा दिली आहे.

उ.९ **खालीलपैकी कोणतेही एक पत्र लिहा :**

१.

विजय शिर्के
विवेकानंद विद्यालय,
त्र्यंबक रोड,
नाशिक.
दि. २१ जानेवारी, २००९

चि. संजय यास,
शुभाशीर्वाद.

कालच आईचे पत्र मिळाले, तुझ्या तब्येतीच्या तक्रारीबद्दल ती फारच चिंतीत आहे. तू आजकाल स्वतःच्या तब्येतीकडे लक्ष देत नाहीस.

अरे, पण हे तुला ठाऊक नाही का ? सतत अभ्यास करून आपले शरीर व मन दोन्हीही कंटाळतात. त्यांना थोडा विरंगुळा पाहिजे ना! त्यासाठी मनोरंजन होणे गरजेचे आहे. पण मनोरंजन असे असावे की ज्यामुळे आनंद व आरोग्य दोन्हीही मिळेल आणि हे दोन्हीही साधू शकते खेळाच्या माध्यमातूनच.

अरे संजय, मैदानी खेळ खेळल्यामुळे शारीरिक तंदुरूस्ती राखली जाते. त्यामुळे शरीराबरोबर मनही निरोगी राहण्यास मदत होते. खेळांमुळे शरीर सुडौल तर बनतेच त्याचप्रमाणे आपले स्नायू मजबूत बनतात, प्रतिकारशक्ती वाढते. खेळामुळे नवीन उत्साह संचारतो, मन ताजेतवाने असेल तर अभ्यासातही एकाग्रता होण्यास मदत होते. त्याचप्रमाणे अभ्यास करून आपण थकतो, तेव्हा हा थकवा दूर करण्यासाठी खेळण्यासारखा दुसरा फायदेशीर पर्याय नाही. कारण खेळण्यामुळे आपल्याला आनंद तर मिळतोच, शिवाय वेळही चांगला जातो.

SAMPLE

आशा करतो की यापुढे तू अभ्यासाबरोबरच खेळण्यासही तितकेच महत्त्व देशील.
ती. बाबा व ती. सौ. आईस साष्टांग नमस्कार. पत्राचे उत्तर देणे. वाट पाहत आहे.

तुझा दादा,
विजय

| | |
|---|---|
| | तिकीट |
| | प्रति,<br>संजय शिर्के<br>'तपस्या', पाषाण रोड,<br>पुणे. |
| प्रेषक,<br>विजय शिर्के<br>विवेकानंद विद्यालय,<br>त्र्यंबक रोड, नाशिक. | |

२.

राजेश जाधव
१४०, वर्मा नगर,
अंधेरी (पू.), मुंबई - ४०० ०६१.
दि. १० जून २००९

प्रति,
माननीय आरोग्याधिकारी,
मुंबई महानगरपालिका,
अंधेरी (पू.), मुंबई - ४०० ०६१.

विषय : <u>बेवारशी कुत्र्यांच्या त्रासाबद्दल तक्रार</u>.

महोदय,

मी वरील पत्त्यावर राहणारा एक त्रस्त नागरिक आहे. या पत्राद्वारे एका फार महत्त्वाच्या गोष्टीकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. गेल्या काही दिवसांपासून आमच्या विभागात मोकाट-भटक्या कुत्र्यांचा उपद्रव फारच वाढला आहे. त्यामुळे आम्हाला अनेक संकटांना तोंड द्यावे लागत आहे.

या कुत्र्यांच्या दिवस-रात्र, वेळी-अवेळी जोरात भुंकण्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासात व्यत्यय येतो. हे कुत्रे सोसायटीतील कचराकुंडीतील कचरा अस्ताव्यस्त पसरवून परिसर अस्वच्छ करतात. फेरीवाले किंवा नागरिकांच्या हातात पिशव्या दिसताच त्यांच्या मागेही लागतात. एक दोघांना ते चावलेही आहेत. त्यामुळे संध्याकाळी सोसायटीत फेरफटका मारण्यास तसेच लहान मुलांना बाहेर खेळण्यासाठी पाठवण्यास येथील नागरिक घाबरत आहेत.

वरील सर्व कारणांमुळे येथील नागरिकांत असंतोष पसरला आहे. त्यामुळे आपण लवकरात लवकर जातीने लक्ष देवून योग्य ती कार्यवाही करून या त्रासातून आम्हाला मुक्ती द्यावी ही नम्र विनंती.

कळावे, तसदीबद्दल क्षमस्व.

आपला नागरिक,
राजेश जाधव

SAMPLE

तिकीट

प्रति,
मा. आरोग्याधिकारी,
मुंबई महानगरपालिका,
अंधेरी (पू.),
मुंबई - ४०० ०६१.

प्रेषक,
राजेश जाधव
१४०, वर्मा नगर,
अंधेरी (पू.),
मुंबई - ४०० ०६१.

**किंवा वृत्तान्तलेखन**

**स्वातंत्र्यदिन समारोहाचा वृत्तान्त**

**पुणे, १५ ऑगस्ट (प्रतिनिधी) -**

येथील शिवाजीनगर परिसरात असलेल्या सरस्वती विद्यालयात १५ ऑगस्ट रोजी भारताचा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला थोर स्वातंत्र्यसैनिक श्री. बाबा चंदावरकर लाभले होते.

शाळेच्या पटांगणातील ध्वजस्तंभावर शाळेचे मुख्याध्यापक श्री. चंदावरकर यांनी तिरंगा ध्वज फडकावला. उच्च स्वरात सर्वांनी ध्वजगीत व राष्ट्रगीत गाऊन ध्वजाला मानवंदना दिली. स्वातंत्र्यवीरांचा त्याग, बलिदान व कर्तव्यनिष्ठा याबाबत श्री. चंदावरकर यांनी मुलांना माहिती दिली. शाळेच्या मुख्याध्यापकांनी स्वातंत्र्यदिनानिमित्त दोन शब्द बोलून सर्वांना शुभेच्छा दिल्या. त्यानंतर शिक्षक व विद्यार्थ्यांनी हातात झेंडे घेऊन नगरामध्ये प्रभातफेरी काढली. प्रभातफेरीमध्ये त्यांनी देशभक्तीवर गीते म्हटली. वातावरणामध्ये एक वेगळाच उत्साह संचारलेला दिसत होता. सुमारे दोन तासाने प्रभातफेरीचे शाळेत पुन्हा आगमन झाले. शेवटी शाळेच्या सर्व मुलांना खाऊचे वाटप करण्यात येऊन कार्यक्रमाचा समारोप झाला.

**किंवा**

**साड्यांच्या सेलची जाहिरात तयार करा.**

**खुशखबर ! खुशखबर !! खुशखबर !!!**

**खास महिलांसाठी पर्वणी !**
**मनपसंद साड्यांची भव्य सेल !!**

५०% पर्यंत सूट



**मंजरी**

**विशेष डिझायनर साड्या !**

पत्ता

गोखले रोड, ठाणे (प.)

❖❖❖❖